# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक ०१/०८/२०२१ (रविवार )

## —: मित्रच निघाला मुळ सुत्रधार देवलापार येथील जबरी चोरीचा स्थानिक गुन्हे शाखेने केला पर्दाफाश :—

दिनांक १६/०७/२१ रोजी सायंकाळचे सुमारास फिर्यादी नामे अमित बालाजी नागपुरे, रा. शनीवार वार्ड, रामटेक हे त्यांचे मित्र अश्विन उके व सोनु सोनावने यांचे सोबत मोटर सायकलने चोरबाहुली मार्गे हिवरा बाजारला येत असता चोरबाहुली गावाचे अगोदर एनएच ४४ महामार्गाने जात असतांना एक अनोळखी सडपातळ बांध्याचा इसम वय अंदाजे ३५ वर्ष लाल रंगाचे चाकडीचे शर्ट घातलेला व तोंडावर लाल रंगाचा स्कार्फ बांधलेला काळया रंगाचे पल्सर गाडीने फिर्यादीच्या गाडीच्या समोर चाकु घेवुन लुटमार करण्याच्या इरद्याने येवुन फिर्यादीच्या पार्श्र्वभागावर घव मारून जखमी करून फिर्यादीचे खिशातुन नगदी ३०,०००/—रू जबरीने हिसकावुन नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन देवलापार येथे अप.क्र. १२४/२१ कलम ३९४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दिनांक ३१/०७/२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपुर ग्रामिण हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना वरिल गुन्हयातील जखमी (फिर्यादी) यांचे सोबत घटनेवेळी सोबत असलेला त्याचा मित्र नामे अश्विन नरेंद्र उके, वय २७ वर्ष, रा. जाम ता. मोहाडी जि. भंडारा, ह.मु.c/o हसमुख पटेल, लाल दिवानशाह दर्गा मागे, बायपास रोड, ता. रामटेक, जि. नागपुर यास संशयावरुन ताब्यात घेवुन त्यास गुन्हयाचे घटने बाबत विचारपुस केली असता प्रथम त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले. त्यास विश्वासात घेवुन पथकास असलेल्या संशयाचे आधारे त्यास अधिक विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, सदर गुन्हयातील जखमी(फिर्यादी) नामे अमित नागपुरे, रा.रामटेक हा त्याचा चांगला मित्र असुन त्याने त्याचे कडुन काही महिने अगोदर १,१४,०००/—रुपये उधार घेतले होते व ते पैसे वेळेत परत न केल्याने अमित नागपुरे याने त्याच्याकडे पैशाची मागणी करुन रोज तगादा लावायचा. त्यामुळे आरोपी अश्विन उके याच्या मनात अमित नागपुरे बद्दल व्देष निर्माण झाला. अमित नागपुरे हा लॉज व्यवसायीक असल्याने त्याचे जवळ नेहमी मोठी रक्कम असल्याचे त्याला माहीत होते. त्याने यातुन मार्ग काढणे करीता त्याचा मित्र नामे विक्की मोरसिंग बोडे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र. २, कन्हान पिपरी, ता. पारशिवनी, जि.नागपुंर याचे मदतीने अमित नागपुरे यास मारहाण करुन लुटमार करण्याची योजना आखली. त्यावरून दिनांक १६/०७/२०२१ रोजी सायंकाळी ०५.१५ वा. सुमारास आरोपी नामे अश्विन उके याने त्याच्या ताब्यातील होंडा कंपनिचे लिओ मोटर सायकल क्र. MH-40-BB-6032 यागाडीवर मध्यभागी अमित नागपूरे व मागे सोनु सोनावणे यास बसवुन उधार घेतलेले पैसे परत करतो असे सांगुन विश्वासात घेवुन पवनी येथे जाण्याचे ठरले. असे ठरल्याप्रमाणे आरोपी अश्विन उके त्याने विक्की बोडे यास माहीती दिली व ठरल्या प्रमाणे चोरबाहुली शिवारातुन रोडने जात असतांना आरोपी विक्की बोडे हा बजाज पल्सर मोटारसायकल ने मागुन आला व त्याने आरोपी अश्विन उके चालवित असलेली मोटारसायकल

थांबविली व लगेच गाडी खाली उतरून आरोपी अश्विन उकेच्या गाडीवर मध्यभागी बसलेला इसम नामे अमित नागपुरे यास धारधार शस्त्राने वार करुन त्याच्या जवळील नगदी ३०,०००/–रुपये जबरीने हिसकावुन घेतले. तेव्हा आरोपी अश्विन उके याने ठरल्याप्रमाणे त्याच्या ताब्यातील गाडी घेवुन घटनेच्या ठिकाणाहुन पळुन गेला. व काही वेळाने जखमी नामे अमित नागपूरे यास संशय येवु नये म्हणुन परत घटनेच्या ठिकाणी येवुन त्यास दवाखान्यात घेवुन गेल्याचे सांगुन सदर ची घटना ही ठरल्याप्रमाणे आरोपी अश्विन उके याने आरोपी नामे विक्की बोडे याच्या हस्ते करविण्यात आली असल्याचे सांगीतले. यावरून आरोपी नामे अश्विन उके याने दिलेल्या माहिती वरुन आरोपी नामे विक्की बोडे यास पो.स्टे. कन्हान परिसरातुन ताब्यात घेवुन त्यास विचारपुस केली असता त्याने सुध्दा अश्विन उके याचे सांगणे प्रमाणे गुन्हा केल्याचे सांगुन आरोपी अश्विन उके यास सदर घटनेमध्ये मदत केल्याबद्दल आरोपी विक्की बोंडे यास २०,०००/–रुपये मिळाल्याचे सांगीतले. वरिल नमुद दोन्ही आरोपींना पोलीस स्टेशन देवलापार यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोस्टे देवलापार करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोहवा नाना राउत, पोशि विपीन गायधने, रोहन डाखोरे, अमोल वाघ, चालक अमोल कुथे व सायबर सेल चे सतिष राठोड यांनी पार पाडली.



## —: अवैधरित्या दारु विक्री व हुक्का पार्लर चालविणाऱ्या हॉटेल वर स्थानिक गुन्हे शाखा नागगपूर ग्रामीण ची धाड एकुण रुपये ६७,६६०/— चा मुद्येमाल जप्त :—

दिनांक ३१/०७/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पथक नागपूर उप विभागात पेट्रोलींग करित असता खात्रीशिर गोपनिय माहिती की, पो.स्टे. बोरी अंतगत नागपूर–चंद्रपूर महामार्गावरील **The Divine Hotel** येथे अवैधरित्या मोठया प्रमाणात दारुची व प्रतिबंधीत सुगंधित तंबाखू ची सर्रास विक्री होत असून ग्राहक यांना जागेवरच हुक्का पार्लरची सोय करुन दिली जात आहे. प्राप्त माहिती वरुन पो.स्टे. बोरी चे स्टाफ व पंचना सह पथकानी नमुद हॉटेल मध्ये धाड टाकळी असता, हॉटेलात बिना परवाना १) रॉयल स्टॉग व्हीस्की बॉटल ०४ नग, बिअर गड वायजर ३१ नग, बिअर कॉल्सबर्ग ०९ नगर, २) पान रजनी, किवी ब्लास्ट, अफजल, अल्फेकर, लेमन मिंट, ऑरंज, मॅगी पान, व्हाईट रापेज, जफ्रान पान सिगार, सल्सा सुपारी,

ब्लीस अश्या प्रकारे विविध प्रतिंबधीत सुबंधीत तंबाखू, हुक्का पॉट १७ नग, २१ हुक्का पाईप असा एकुण रुपये ६७,६६०/—चा मुद्येमाल जप्त करुन आरोपी अश्विन विनोद धनविजय वय ३२ वर्ष रा. चंद्रमणीनगर नागपूर, २) संदेश विवेक बिनक वय २९ वर्ष रा. नरेन्द्रनगर म्हाडा कॉलोनी नागपूर यांना ताब्यात घेवून त्यांचे विरुध्द पो.स्टे. बोरी येथे अप क्रमांक ३३४/२०२१ कलम ६५(ई),६६(१)८३,८४ मदाका सहकलम ४,२१ सिगरेट आणि ईतर तंबाखू उत्पादन प्रति. अधिनियम २००३, १८८ भादवि गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्था.गु.शा. नागपूर ग्रामीण चे पोनि अनिल जिट्टावार, सपोनि जितेन्द्र वैरागडे, पोहवा महेश जाधव, राजेन्द्र चौधरी, संतोष पंधरे, मदन आसटकर, पोना रामराव आडे, राजेश रेवतकर पोशि अमृत किनगे, बालाती साखरे, राधेश्याम कांबळे, महेश बिसेन, चापोहवा भाऊराव खंडाते व पो.स्टे. बोरी चे मपोउपनि कुमुदिनी पथोडे, पोहवा संजय वैद्य, असलम औरंगाबादे, पोशि मनिष कन्नाके यांनी पुर्ण केली.



## —: चोरी (मोटार सायकल ) :—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ३ किमी अंतरावतील वार्ड क्र ५ वानखेडे दवाखना समोर महेद्र रामहरीजी बोंदे रा. भानेगाव यांनी आपली लाल रंगाची मोसा होन्डा शाईन क्र एम एच ३१ डीक्यु ६०८८ उभी करून आपल्या मालकाकडे कामाचे पैसे मागन्यास त्याचे घरी जावुन गाडी उभी केले असल्याचे ठिकानी परत आला असता त्यांना मोटार सायकल दिसली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी महेद्र रामहरीजी बोंदे वय ५० रा भानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ जानुसिंग जाधव मो ९९२३१०४३१० हे करित आहेत.

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत ३ किमी अंतरावतील सालाई धाबा शिवरात दिनांक ३०/०७/२०२१ रोजी कैलास कुवरलाल कटरे रा. वार्ड नं. १ बुटीबोरी हे आपली स्प्लेंडर प्लस **मो.सा. क्र. एमएच — ४०**

**बीवाय — ९६१६** एस.ओ.एस. कंपनी समोर उभी करुन कंपनीत गेले असता कंपनीतून बाहेर आल्यावर त्यांना त्यांची मोटार सायकल दिसली नाही कोणीतरी अज्ञात इसमांनी मोसा चोरुन नेली

सदर प्रकरणी फिर्यादी कैलास कुवरलाल कटरे वय २६ रा. वार्ड नं. १ बुटीबोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा दयाराम करपाते मो.नं.९९६०६८२४७८ हे करित आहेत.

पो.स्टे. काटोल :— दिनांक ३०/०७/२०२१ रोजी युवराज भाडरावजी कुकडे रा. डोरली (भांडवलकर) हे आपली मो.सा क्र. एम एच ४० ए एन ४०५६ काळया रंगाची होन्डा शाईन घेवुन अरविंद सहकारी बॅक काटोल चे समोर उभी करून लॉक करून बाजारात गेले बाजार करून मोटारसायकल जवळ आले असता त्यांना त्यांची मोटार सायकल दिसली नाही. कोणीतरी अज्ञात इसमांनी मोसा चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी युवराज भाडरावजी कुकडे वय २८ वर्ष रा. डोरली (भांडवलकर) काटोलयांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कटोल बोरी येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पो.ना. संतोष आंधळे मो.क्र. ८३८०८३३४२४ हे करित आहेत.

## —: चोरी (चारचाकी मधुन पार्ट ) :—

पो.स्टे. खापरखेडा :— दिनेश सेवकरामजी लोढेकर रा. वार्ड क्र २ खापरखेडा, यांनी दिनांक ३०/०७/२०२१ रोजी रात्री आपला टॅक्टर क्र एम एच ४० सी ए ४३९४ आपले घराचे बाजुला असलेला प्लॉट मध्ये उभे केले असता ट्रॅक्टरमध्ये लागलेला ॲमरॉन कंपनीचा बॅटरी किमती ३००० रू ची कोनीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी दिनेश सेवकरामजी लोढेकर वय ३८ वर्ष रा खापरखेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोना सुरेंद्र वासनिक मो.क्र. ९८२३१९६८२१ हे करित आहेत.

## —: अकस्मात मृत्यु :—

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :—** अंतर्गत ०३ किमी अंतरावरील मौजा टाकळघाट येथील रहवासी राजेद्र आदीनाथ गाते रा.मोठी आंजी जि.वर्धा ह.मु. टाकळघाट ता. हिगंणा जि. नागपूर यांची पत्नी सौ. प्रिती राजेद्र गाते वय २८वर्ष ला दि. १२.०७.२०२१ रोजी १०.३० वा. डिलीवरी होवुन सोबतच फॅमीली प्लॅनींगचे ऑपरेशन केल्याने तिला अशक्त असल्याने चालने—उठने होत नसल्याने दि. ३१.०७.२०२१ रोजी प्रकृती जास्त खराब झाल्याने माया हॉस्पीटल, बोरी येथे उपचाराकरीता नेले असता तेथील डॉक्टरांनी पहाटे ०४.०० वा तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी राजेद्र आदीनाथ गाते वय ३० वर्ष, रा.मोठी आंजी जि.वर्धा ह.मु. टाकळघाट ता. हिगंणा जि. नागपूर धंदा—मजूरी चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. **एमआयडीसी बोरी** येथे मर्ग क्र. १७/२०२१ कलम १७४ जाफौ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आला असून पुढील तपास मपोउपनि पल्लवी काकडे **मो.न.** ९५११८ ३४७५४ हे करीत आहेत.

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक ३१/०७/२०२१ रोजी दुपारी १५.०० वा. दरम्यान सौ. श्वेता विशाल चंहादे सहाय्यक ट्रेक—मॅन यांनी पोलीस स्टेशन चा येवून लेखी मेमो दिला की, रेल्वे फाटक कळमेश्वर ते नागपुर अपलाईन वर एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० ते ५० वर्षाचा रेल्वेने कटुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. श्वेता विशाल चंहादे (सहाय्यक ट्रेक—मॅन) वय ३८ वर्ष रा. संत लहानुजी नगर जरीपटका पोलिस स्टेशन च्या मागे चे लेंखी मेमो वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे मर्ग क्र. ७५/२०२१ कलम १७४ जाफौ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आला असून पुढील तपास सफौ राजेंद्र पाली मो क्र. ९०११०३८६७७ हे करीत असून तपास दरम्यान मृतकाची ओळख पटली आहे मृतक लावा—दाभा येथील रहवासी सुनिल वानखेडे आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**